
# जळगाव- महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर व गर्भसंस्कार समुपदेशन

शुक्रवार,दिनांक 20/06/2025 रोजी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय जळगावच्या स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभागामार्फत आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, शिरसोली प्र. बो,जळगाव येथे महिलांसाठी आरोग्य तपासणी व गर्भसंस्कार समुपदेशन शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी जवळपास 40 रूग्णांची तपासणी करण्यात आली.यामध्ये गर्भवती,सुतिका,वंध्यत्व इ.चा समावेश होता.स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ.सोनाली फराटे यांनी रुग्ण तपासणी केली व समुपदेशन केले,तसेच गर्भसंस्काराचे महत्व या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले.BAMS अंतिम वर्ष विद्यार्थ्यांनी गर्भावस्थेतील योगासने व प्राणायाम यावर प्रात्यक्षिके सादर केली.जवळपास 60 महिला व  आशा वर्कर यांनी या शिबिराचा लाभ घेतला व संवाद साधला.

बालरोग तज्ज्ञ डॉ.किरण नंदेश्वर,वैद्यकीय अधिकारी डॉ.स्वाती मगर,उपकेंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ करुणा भालेराव शिबिराला उपस्थित होते.सदर शिबिरासाठी आयुष संचालक आदरणीय डॉ.रामन घुंगराळेकर सर, अधिष्ठाता डॉ.आगतराव औघडे सर यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.राहुल चौधरी, उपवैद्यकीय अधिक्षक डॉ.अश्विनी निर्माळे,स्त्रीरोग व प्रसूतीतंत्र विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ.स्वाती बळी यांनी सहकार्य केले.

# <u>महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर व गर्भसंस्कार समुपदेशन कार्यक्रमाचे फोटो (दि. 20/06/2025)</u>










GPS Map Camera
Shirsoli P.b., Maharashtra, India
Wgfm+f95, Shirsoli P.b., Maharashtra 425002, India
Lat 20.923793° Long 75.534182°
20/06/2025 11:22 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Shirsoli P.b., Maharashtra, India
Wgfm+f95, Shirsoli P.b., Maharashtra 425002, India
Lat 20.923857° Long 75.534101°
20/06/2025 11:02 AM GMT +05:30
Google